आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

२२ जून २०२६ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- ब्रिक्स देशांच्या राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारांची बैठक आज नवी दिल्लीत

- महाराष्ट्र विधानपरिषदेच्या ११ जागांपैकी १० जागांवर महायुतीचे उमेदवार विजयी

- महाराष्ट्रात विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला प्रारंभ/ ९७ हजार ७०६ कोटी ४० लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर

- अमेरिका इराण चर्चा सुरु झाल्यानंतर कच्च्या तेलाचे दर घसरले

**आणि**

- नीट फेरपरीक्षेत पेपर फुटल्याचं वृत्त एनटीएने फेटाळलं

**<><><><><>**

नवी दिल्लीत आजपासून दोन दिवस ‘ब्रिक्स राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार बैठक’ आयोजित करण्यात आली असून, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल या बैठकीच्या अध्यक्ष स्थानी असतील. ‘आजच्या जगापुढली अ-पारंपरिक सुरक्षा विषयक आव्हानं’, या संकल्पनेवर आधारित असेलेल्या या बैठकीत, सदस्य देशांचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार आणि शिष्टमंडळ प्रमुख आपले विचार मांडतील.

राष्ट्रीय सुरक्षेपुढल्या आव्हानांचं बदलतं स्वरूप, तसंच उद्याचे सुरक्षा विषयक धोके हाताळण्यातली तंत्रज्ञानाची भूमिका, या मुद्द्यांवरही यावेळी चर्चा होईल. तसंच, दहशतवाद विरोधी कारवाई आणि माहिती आणि दूरसंवाद तंत्रज्ञानाच्या वापराबाबतची सुरक्षा, या विषयावर नुकत्याच झालेल्या ब्रिक्स संयुक्त कार्यगटाच्या बैठकीच्या निष्कर्षांचा आढावा घेतला जाईल.

**<><><><><>**

महाराष्ट्रात विधानपरिषदेच्या अकरा जागांसाठी झालेल्या निवडणुकीचे निकाल आज जाहीर झाले. अकरापैकी दहा जागांवर महायुतीचे उमेदवार विजयी झाले असून नाशिकच्या एका जागेवर अपक्ष उमेदवार विजयी झाला आहे. सहा जागांवर महायुतीचे उमेदवार बिनविरोध निवडले गेले आहेत, त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रतिनिधींद्वारे निवडल्या जाणाऱ्या

विधानपरिषदेच्या द्वैवार्षिक निवडणुकीत १७ पैकी १६ जागा जिंकत महायुतीने दणदणीत विजय मिळवला आहे. **नांदेड** मतदारसंघातून अमरनाथ राजुरकर, **सांगली सातारा** मतदारसंघातून धैर्यशील कदम, **भंडारा गोंदिया** मतदारसंघातून अविनाश ब्राह्मणकर, **छत्रपती संभाजीनगर - जालना** मतदारसंघातून सुहास शिरसाट, **जळगाव** मधून नंदकिशोर महाजन, **सोलापूर** राजेंद्र राऊत, **अमरावती** प्रवीण पोटे तर **लातूर-बीड-धाराशिव** मतदारसंघातून बसवराज पाटील विजयी झाले आहेत. **नागपूर** मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत भाजपाच्या राजीव पोतदार यांनी विजय मिळवला. तर **परभणी-हिंगोली** मतदारसंघातून शिवसेनेचे सईद खान विजयी झाले. **नाशिक** मतदारसंघातून शिवसेनेच्या नरेंद्र दराडे यांना पराभवाचं तोंड पाहावं लागलं आहे, इथून भाजपा नेते गणेश गिते यांचे बंधू गोकुळ गिते हे अपक्ष म्हणून निवडून आले आहेत.

ठाणे, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग, पुणे, यवतमाळ, वर्धा-गडचिरोली-चंद्रपूर आणि अहिल्यानगर या सहा जागांवर महायुतीचे उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत.

**<><><><>**

महाराष्ट्र विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला आज मुंबईत सुरुवात झाली.

सुरवातीला विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी नवनिर्वाचित सदस्य सुनेत्रा पवार आणि अक्षय कर्डिले यांना सदस्यत्वाची शपथ दिली. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सन २०२६-२७ च्या ९७ हजार ७०६ कोटी ४० लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या सभागृहात सादर केल्या.

अल निनो प्रभावामुळे नैऋत्य मोसमी पावसाला विलंब झाल्यानं राज्याच्या विविध भागांत पाणीटंचाई निर्माण झाल्याचा मुद्दा काँग्रेस नेते नाना पटोले यांनी सभागृहात उपस्थित केला. त्यावर योग्य चर्चा घडवून आणायचं आश्वासन अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिलं.

त्यानंतर पद्मविभूषण आशा भोसले, पद्मभूषण सुमन कल्याणपूर, माजी मंत्री अनंतराव थोपटे, विठ्ठलराव धोटे, बळीराम कोटकर-पाटील, कृष्णराव देशमुख, पटल्या मावसकर, वसंतराव सूर्यवंशी, सुरेशकुमार जेथलिया, उषादेवी जगदाळे आणि शकुंतला शर्मा यांना सभागृहाने श्रद्धांजली वाहिली. त्यानंतर सभागृहाचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२२ जून २०२६ - सोमवार

**विधानपरिषदेत** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नवनिर्वाचित सदस्यांचा परिचय सभागृहाला करून दिला. त्यानंतर सन २०२६-२७साठीच्या पुरवणी मागण्या अर्थ राज्यमंत्री आशिष जैस्वाल यांनी सादर केल्या. सभापती राम शिंदे यांनी प्रमोद जठार, कृपाल तुमाने, संजय खोडके, अभिजित वंजारी आणि सुनील शिंदे यांची तालिका सभापतीपदी नियुक्ती केली. त्यानंतर पद्मविभूषण आशा भोसले, पद्मभूषण सुमन कल्याणपूर, माजी आमदार भाऊराव देशमुख आणि सुरेशकुमार जेथलिया यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर सभागृहाचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

<><><><><>

अमेरिका आणि इराण दरम्यान स्वित्झर्लंडमध्ये चर्चा सुरु झाल्यानंतर आज जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत ३ टक्क्यांपर्यंत मोठी घट झाली. यामुळे कच्च्या तेलाचा पुरवठा सुरळीत होण्याची, तसंच इराणकडून होणाऱ्या तेल निर्यातीत वाढ होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

पश्चिम आशियामधील तणाव दूर करण्याच्या, तसंच युद्ध विराम कायम ठेवण्याच्या उद्देशानं अमेरिका आणि इराणच्या अधिकाऱ्यांमध्ये सुरु असलेल्या चर्चेची पहिली फेरी पूर्ण झाल्यानंतर ही घट दिसून आली.

यामुळे आंतरराष्ट्रीय ‘बेंचमार्क’ असलेल्या 'ब्रेंट क्रूड'च्या किमतीत २ टक्क्यांपेक्षा जास्त घसरण झाली, आणि ती प्रतिबॅरल सुमारे ७९ डॉलरवर आली. तर अमेरिकेच्या 'वेस्ट टेक्सास इंटरमीजिएट' क्रूडचा व्यवहार प्रति बॅरल ७५ डॉलर वर झाला. ही घट सुमारे ३ टक्के इतकी आहे.

<><><><><>

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस जयशंकर दोन दिवसांच्या मंगोलिया दौऱ्यावरआहेत. मंगोलियाचे परराष्ट्रमंत्री बी बत्तसेत्सेग यांच्याशी तसंच इतर नेत्यांशी ते चर्चा करणार आहेत.

मंगोलियानंतर डॉ जयशंकर दक्षिण कोरियाला जाणार आहेत. दक्षिण कोरियाचे परराष्ट्र मंत्री चो ह्यून यांच्याशी ते चर्चा करतील. शांतता आणि समृद्धीसाठी च्या जेजू परिसंवादात ते येत्या गुरुवारी बीजभाषण करणार आहेत.

<><><><><>

नीट फेरपरीक्षेत पेपर पुन्हा फुटल्याच्या वृत्ताचा राष्ट्रीय चाचणी संस्थेनं इन्कार केला आहे. नीट फेरपरीक्षा २०२६चा पेपर टेलिग्राम या समाजमाध्यम मंचावर परीक्षेआधी फुटल्याची चर्चा होती. मात्र कालची परीक्षा सुरक्षित आणि गैरप्रकारमुक्त वातावरणात पार पडल्याचं एनटीएने म्हटलं आहे. अशी वृत्त फैलावण्यासाठी जबाबदार असणाऱ्यांवर कारवाई केली जाईल. भारतीय सायबर गुन्हे समन्वय केंद्र आणि इतर यंत्रणांच्या मदतीने या प्रकाराचा तपास सुरु आहे. विद्यार्थी आणि पालकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, कोणतीही माहिती www.neet.nta.nic.in या संकेतस्थळावर पडताळून पहावी असं आवाहन एनटीएने केलं आहे.

**<><><><><>**

मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाची काल महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या उपस्थितीत सांगता झाली. महोत्सवात सिल्व्हर या पोलिश चित्रपटाला सर्वोत्तम माहितीपटासाठीचा सुवर्ण शंख प्राप्त झाला. तर मायाज् साँग या चित्रपटाला सर्वोत्तम ॲनिमेशनपटाचा रौप्य शंख मिळाला. अंडर द स्नो चित्रपटाला सर्वोत्तम लघुकथेवर आधारित चित्रपटाचा रौप्य शंख मिळाला. राष्ट्रीय स्पर्धा विभागात सर्वोत्कृष्ट ॲनिमेशन पटासाठी आर्मस्ट्राँग फ्रॉम अंगालम्मन स्ट्रीट या चित्रपटाला गौरवण्यात आलं. स्मॉल क्लाउड या चित्रपटाला सर्वोत्तम लघुकथेवर आधारित, तर वाई या चित्रपटाला सर्वोत्तम माहितीपटाचा रौप्य शंख प्राप्त झाला. द ओल्ड बुल नोज ऑर वन्स न्यू या चित्रपटाला सर्वोत्तम चित्रपटाचा पुरस्कार मिळाला. तर 'विकसित भारत/वंदे मातरमची 150 वर्षे/भारत@2026' या विषयावरील सर्वोत्तम लघुपटाचा पुरस्कार 'द लास्ट शेल्टर' या चित्रपटाला मिळाला. सर्वोत्कृष्ट नवोदित  दिग्दर्शकासाठीचा दादासाहेब फाळके चित्रनगरी पुरस्कार पूजा तोलानी यांना प्रदान करण्यात आला.

**<><><><><>**

मुंबईत विविध मागण्यासाठी बेस्ट उपक्रमातल्या कर्मचाऱ्यांनी पुकारलेला बेमुदत संप काल मागे घेतला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली काल कर्मचारी संघटनांबरोबर झालेल्या बैठकीत परिवहन मंत्री प्रतार सरनाईक, आमदार सचिन अहिर मुरजी पटेल, तसंच महानगरापालिका आयुक्त अश्विनी भिडे, बेस्ट उपक्रमाच्या महाव्यवस्थापक सोनिया सेठी उपस्थित होते. पुढचा सविस्तर वेतन करार होईपर्यंत बेस्ट मधल्या कायम

कामगारांना दरमहा तीन हजार रुपये तर कंत्राटी कामगारांना दरमहा दोन हजार रुपये वेतनवाढ तूर्त दिली जाईल. प्रलंबित देय अंशदानाची रक्कम चालू आर्थिक वर्षात दिली जाईल, इत्यादी मुद्दे मान्य झाल्यावर संप मागे घेतल्याचं संपकरी संघटनांनी जाहीर केलं.

<><><><><>

मणिपूरमध्ये सक्रिय असलेल्या आणि बंदी घालण्यात आलेल्या, PLA, अर्थात 'पीपल्स लिबरेशन आर्मी' या बंडखोर संघटनेच्या एका फरारी सदस्याला, गोवा पोलिसांच्या गुन्हे शाखेनं काल फतोर्डा-मडगाव या परिसरातून अटक केली.

'नॉन्गथोंगबम इंगो' अशी त्याची ओळख असून, ‘कृष्ण’, आणि ‘लाल’ या नावांनीही त्याला ओळखलं जातं. जवळजवळ दोन दशकांपासून तो फरार होता. ‘इंगो’, हा PLA संघटनेचा स्वयंघोषित लेफ्टनंट कर्नल होता. अटकेनंतर, पुढल्या कायदेशीर कारवाईसाठी त्याला मणिपूर पोलिसांच्या ताब्यात दिल्याचं पोलीस सूत्रांनी सांगितलं.

//<><><><><>//